# The Baptist Tabernacle of Los Angeles

Mailing Address:
P. O. Box 15308
Los Angeles, CA 90015
Phone: (213) 744-9999
E-mail: rlhymersjr@sbcglobal.net
www.sermonsfortheworld.com
www.baptisttabernacle.com




Jack Ngann
Pastor

Dr. R. L. Hymers, Jr.
Pastor Emeritus

डिसेंबर, 2021

प्रिय मित्रः

आपण जे कष्ट सहन करतो ते किती मोठे आहेत, आणि देवाचा चांगुलपणा किती मोठा आहे! ह्या वर्षी माझी देवभिरु व प्रेमळ पत्नी एलिना हीची कोरोना तपासणी सकारात्मक आली. मला वाटले ती मरते ती. आमच्या मंडळीने तिच्यासाठी भरपूर प्रार्थना केल्या. आणि संपूर्ण जगभरातून पाळकवर्ग आणि ख्रिस्ती बांधवानी तिच्यासाठी प्रार्थना केल्या आणि तिला संदेश देऊन सांत्वना व आधार दिला. पाकिस्तानातील एक प्रचारक तिला रोज सकाळी जगभरातून दूरध्वनी करायचा! परमेश्वराने उत्तर दिले आणि ती पूर्णतः बरी झाली! तिच्यासाठी ज्या सर्वांनी प्रार्थना केल्या त्यांना मी धन्यवाद देतो.

माझ्या जीवनाचे वचन हे नेहमी फिलिप्पैकरांस पत्र 4:13 आहे. मी ते तुमच्यासमोर वचनासह देतो. पवित्रशास्त्र म्हणते,

> Œदैन्यावस्थेत राहणे मला समजते, संपन्नतेतही राहणे समजते; हरएक प्रसंगी अन्नतृप्त असणे व क्षुधित असणे, संपन्न असणे व विपन्न असणे, ह्याचे रहस्य मला शिकविण्यात आले आहे. मला जो सामर्थ्य देतो त्या ख्रिस्ताकडून मी सर्वकाही करण्यास शक्तिमान आहेæ( फिलिप्पै. 4:12, 13).

ख्रिस्ताने मला व एलिना आम्हां दोघांना ख्रिस्ताने तिच्या आजारपणात सामर्थ्य दिले. आणि जसे आम्ही आनंद करु आणि तिच्या आरोग्याबद्दल देवाला धन्यवाद देऊ. Œमला जो सामर्थ्य देतो त्या ख्रिस्ताकडून मी *सर्वकाही* करण्यास शक्तिमान आहे.æ

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ शेचाळीस भाषांमधून WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***

24 मार्च रोजी खालचे लॉस एंजिल्स मधील आमची जुनी इमारत विकल्या नंतर शेवटी आमचा आर्थिक करार संपुष्टात आला. आता त्या इमारतीत एक कोरियन मंडळी भरते. सॅन गॅब्रीएल येथील मंडळीची नवीन इमारतीची सुधारणा करण्यास पैसा वापरला जात आहे. जॅक नगान हा नवीन मंडळी, "द चाइनीज बॅप्टिस्ट टॅबरनिकल ग्रेटर लॉस एंजिल्स" चा पाळक असणार."

11 एप्रिल रोजी माझा वाढदिवस साजरा करण्यासाठी आम्ही सर्व अलिशान बेव्हरली हिल्टन होटेल मध्ये भेटलो, जो पुढच्या दिवशी घेण्यात आला. संपूर्ण जगभरातून प्रचारक व ख्रिस्तीजणांकडून माझ्या वाढदिवसाच्या पुष्कळ शुभेच्छा आल्या. आमचा मुलगा रॉबर्ट लेस्ली याने मेजवानी व त्या संबंधीत सगळ्या बाबीचे पैसे दिले. रॉबर्ट हा एक हुशार व यशश्वी उद्योजक आहे. डॉमनिक रिपब्लिक येथील बेथसदा ख्रिश्चन चर्च चे पाळक रेव्ह. रुपेर्टो मेडिना, येथे ह्या समारंभासाठी आले व त्यानी आरंभीची प्रार्थना केली. किती सुंदर तो समय होता!

3 मे रोजी आमच्या संकेतस्थळ www.sermonsfortheworld.com वरुन ओडिया भाषेतून उपदेश प्रसारित झाला ओडिया ही भाषा भारतातील अनेक भाषांपैकी एक आहे. 30 मिलियन पेक्षा जास्त लोक त्यांची पहिली भाषा म्हणून ही बोलतात! मी ह्या उपदेशासाठी पैसे मागत नाही. माझी एकच इच्छा आहे की संपूर्ण जगात शक्य तितक्या जास्त भाषांमधून सुवार्ता पोहंचली जावी ही आहे. त्यामुळे ह्या उपदेशाचे हस्तलिखित नकल करण्यास मनाई नाही, आणि लोक त्यातून प्रचार करु शकतात किंवा त्यांना जसे हवे तसा त्याचा वापर करु शकतात. दर आठवडी मला संपूर्ण जगभरातून मी संदेश उपलब्ध करुन दिल्याबद्दल धन्यवादाचे इमेल येतात.

14 मे रोजी एक मोठी घटना घडली. आमचा नातू रॉबर्ट लेस्ली हायमर्स IV याचा जन्म झाला होता! तो माझा मुलगा व त्याची बायको जीन ह्यांचा मुलगा. त्यांना हन्ना व सारा, ह्या दोन मुली सुद्धा आहेत. नवे बाळ हा आमचा पहिला व एकमेव नातू आहे. मी त्याला "छोटा बॉब" अशी हाक मारतो. तो खूप छान मुलगा आहे, आणि मी प्रार्थना करितो की देव त्यांला प्रचारक म्हणून पाचारण करील!

ख्रिस्ताने मला चांगल्या व वाईट समयी सामर्थ्य दिले, मी जेव्हां तृप्त होतो, मी जेव्हां उपाशी होतो तेव्हांही, जेव्हां संपन्नतेत होतो तेव्हां व विपन्नतेत होतो तेव्हां सुद्धा. जून मध्ये मला मेंदूचा झटका आला. तेव्हांपासून मी घरामध्ये विश्रांती घेत आहे. माझ्यासाठी एक व्यवसायिक काळजी घेणारी आहे जी मला मदत करते, परंतू माझी सर्वात मोठी मदतनीस माझी बायको एलिना आहे. काहीही असू दे, मी सुवार्तेची सेवा कधीही सोडणार नाही. दर आठवडी मी एक उपदेशाचा

व्हिडिओ बनवितो जो माझ्या मंडळीत दाखविला जातो आणि आमच्या संकेतस्थळावर सुद्धा प्रसारित केला जातो. माझ्या संपूर्ण जीवनात, ख्रिस्त मला सामर्थ्य देतो!

मी माझ्या मंळीमध्ये मारीलिन फार्निक यांची गोष्ट वारंवार सांगितली. सॅन फ्रान्सिस्कोच्या दक्षिणेकडील, मरीन काऊंटी मध्ये फार वर्षापूर्वी ती एक तरुण मुलगी होती. मारीलिनने येशूवर विश्वास ठेवला. मारीलिनने मादक द्रव्ये घेतली किंवा मुलांबरोबर शारिरीक संबंध ठेवले तरी तिच्या आईला हे चालणारे होते – परंतू तिच्या आईला ख्रिस्तामध्ये कसलाच रस नव्हता! तिने मारीलिनला घराबाहेर काढून टाकले. परंतू मारीलिन तारणा-याबरोबर विश्वासू राहिली. तिच्या नवरा जेरी याच्याबरोबर, ती आता झेक रिपब्लिक मध्ये सुवार्तिक (मिशनरी) म्हणून आहे. 26 ऑगस्ट रोजी जेरी व मारिलिन यानी आमच्या घरी भेट दिली. त्यांनी त्यांच्या सेवेचे सादरीकरण केले त्याचे मी व्हिडिओ रेकॉर्डींग केले आणि ते मंडळीला दाखविले. ते किती आशिर्वादित आहेत! लोकांचे तारण करणा-या लोकांवर देवाची दया आणि त्यांचा उपयोग त्याच्या सेवेसाठी करताना पाहणे किती अद्भूत आहे. जसे की प्रेषित योहान म्हणाला, "माझी मुले सत्यात चालतात, हे ऐकून मला आनंद होतो तितका दुसरा कशानेही होत नाही" (III योहान 4).

29 ऑगस्ट रोजी जॅक नगान यास आमच्या मंडळीचे नवीन पाळक म्हणून सादर करण्यात आले होते. जॅक नगान हे अमेरिकेत-जन्मलेले चीनी मनुष्य आहेत. ते विवाहित असून दोन मुलांचे बाप आहेत. मी एमिरटस् पाळक माझे स्वतःचे पाळक डॉ. तिमथी लिन यांनी मला प्रशिक्षण दिले त्याप्रमाणे, त्याला पाळकीय सेवेचे प्रशिक्षण देत आहे. नगान बंधू हे उत्तम ख्रिस्ती आहेत आणि आम्हांस त्यांच्याकडून खूप आशा आहेत. कृपया आमच्या नवीन मंडळीसाठी आणि तेथील सेवेसाठी प्रार्थना करा.

22 सप्टेंबर रोजी आमच्या सॅन गॅब्रीएल येथील नवीन मंडळीच्या इमारतीच्या नूतनीकरणाचे काम सुरु करण्यात आले. इमारत पुढील वर्षीच्या सुरुवातीला तयार होईल. ही इमारत हजारो चीनी लोकांच्यामध्ये स्थित आहे.

ऑक्टोबर मध्ये एलिनाचे वडील रफाएल क्युएलर ग्वाटेमाला येथून निघून गेले आणि काही आठवडे ते आमच्या घरात राहिले. ते एक सभ्य पुरुष आहेत, आणि खूप संजिदा व क्रियाशील असे आहेत – तसेच सर्वात मोठे व जर तुम्हाला ठाऊक असेल तर ते 90 वर्षाहून अधिक वयाचे आहेत! 29 ऑक्टोबर रोजी आम्ही त्यांचा 91 वा वाढदिवस मंडळीबरोबर आमच्या घरात साजरा केला.

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ शेचाळीस भाषांमधून WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***

21 नोव्हेंबर आमच्या घरात संपूर्ण मंडळीने उपकारस्तूतीची मेजवानी ठेवण्यात आली होती. ती खरोखर चवदार होती! आम्ही एलिना, जॅक नगान, आणि आमची डिकन मनुएल मेन्सिया याचें अन्न शिजवणे आणि रात्रभोजच्या तयारीसाठी धन्यवाद देतो.

हे वर्ष अगदी शांततेचे होते! सर्व महिमा परमेश्वराला ज्याने आमच्या प्रार्थनेची उत्तरे दिली आणि ख्रिस्त ज्याने आम्हांला तारण दिले. मला जॉर्ज बेव्हर्ली शीआ यानी 1991 मध्ये ग्लासगो, स्कॉटलंड येथील बिली ग्रॅहमच्या प्रचार सभेत गायलेल्या गाण्याचे बोल आठवतात,

> धन्यवाद, हे माझ्या बापा, तुझा पुत्र आम्हांस दिल्याबद्दल
> आणि पृथ्वीतलावरील कार्य संपेपर्यंत तुझा आत्मा आम्हांस दिल्याबद्दल.
> ("तेथे मुक्तिदाता आहे" किथ ग्रीन यांच्याद्वारा,1953-1982).

जसा की आपण तारणा-याचा वाढदिवस करीत आहोत तर चला उठा कंठरव करा, "धन्यवाद, प्रभू परमेश्वरा. आणि माझ्या येशू ख्रिस्ताची स्तुति असो!"



मी माझ्या नातींबरोबर पहिल्या रांगेच्या मधोमध आहे, हन्ना डाव्या बाजूला व सारा उजव्या बाजूला. मागील रांगेत, डावीकडून उजवीकडेः एलिनाचे बाबा रफाएल क्युएलर, एलिनाची आई लिंडा, रॉबर्टची पत्नि जीन, लहान बॉबला रॉबर्टने घेतलेले, माझी पत्नि एलिना, आमचा मुलगा वेस्ली, व एलिनाची बहिण युवेटी क्युएलर

येशूच्या नावामध्ये आपला,



रेव्ह. आर. एल. हायमर्स, ज्यु.,
डी. मिन., डी. रेल., टीएच.डी., लिट.डी.
फिलिप्पै. 4:13

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ शेचाळीस भाषांमधून WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***